महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
**मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प**
**विभागीय अंमबजावणी कक्ष, छत्रपती संभाजीनगर**
**कार्यालयः- विभागीय कृषि सह संचालक, छत्रपती संभाजीनगर,**
**चेतना मंगल कार्यालय (रामायणा कल्चरल हॉल), ओंकारेश्वर चौक, उल्कानगरी, छत्रपती संभाजीगर – ४३१००९**
**दूरध्वनी क्रमांक** : ०२४०-२३३१०९४ **ई मेल** :

जा.क्र./वि.प्र.अ.क./स्मार्ट/ प्रो कॉन / 575 /२५-२६ दिनांक :- ०१/१०/२०२५

प्रति,

**नोडल अधिकारी,**

जिल्हा अंमलबजावणी कक्ष,

स्मार्ट प्रकल्प, बीड.

**विषयः- स्मार्ट प्रकल्पांतर्गत प्रो कॉन फार्मर प्रो.कं.लि., ता.माजलगाव जि.बीड यांच्या चौथ्या देयक अदायगी करण्या शिफारस करणे बाबत.**

**संदर्भ** :- १. मा.प्रकल्प संचालक, स्मार्ट प्रकल्प, पुणे यांचे पत्र जा.क्र.पीसीएमयु/Civil/२६७/२०२५ दि.०६/०२/२०२५.

२.या कार्यालयाचे पत्र जा.क्र.४४० दि.१३/०८/२०२५

३.नोडल अधिकारी, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, बीड यांचे पत्र जा.क्र.५१४ दि.०३.०९.२०२५.

४ . या कार्यालयाचे पत्र जा.क्र.५५४ दि.२५ /०९/२०२५

५ . दि. ३० /०९ /२०२५ रोजीची विभागीय नोडल अधिकारी, नोडल अधिकारी जिल्हा अंमलबजावणी कक्ष , विभागीय तंत्र अधिकारी व विभागीय सहाय्यक अभियंता स्थापत्य यांची क्षेत्रीय भेट.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन, जागतिक बँक अर्थ सहाय्यित मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत संदर्भ क्र.३ नुसार प्रो कॉन फार्मर प्रो.कं.लि., ता.माजलगाव जि.बीड यांच्या **चौथ्या** देयक अदायगी मिळण्यासाठी नोडल अधिकारी, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, **बीड** यांनी या कार्यालयास शिफारस केली होती. संदर्भ क्र.२ नुसार electrical च्या आवश्यक्तेची विचारणा जिल्हा अंमलबजावणी कक्षशास केली असता संदर्भ क्र.३ च्या पत्रानुसार electrical कामाची आवश्यकता असल्याचे त्यांनी कळविले आहे व सोबत इलेक्टीकल अभियंत्याचा अहवाल जोडण्यात आला आहे.

संदर्भ क्रमांक१ नुसार २५% पेक्षा अधिक झालेल्या परिमाणास(quantiiy) विभागास संमती देण्याचे अधिकार आहेत. सदरच्या प्रकरणात इलेक्ट्रिकल कामाचे आठ घटकांमध्ये २५% अधिकचे परिमाण आढळून येत आहे. संदर्भ क्रमांक ४ अन्वये दिनांक ३०/०९/२०२५ रोजी विभागीय स्तरावरून प्रकल्प भेट देण्यात येणार असल्याचे कळविण्यत आले होते.त्या अनुषंगाने ३०/०९/२०२५ रोजी समुदाय आधारित संस्थेच्या संचालक श्री रमेश कुटे व इतर सदस्य/संचालक उपस्थित होते व CBO व ठेकेदारा चे अभियंता अनुपस्थित होते. या दिवशी झालेल्या कामाची पाहणी करण्यात आली समक्ष CBO संचालकसह Eletrical चे काम पूर्ण झाल्याचे

कार्यालय:- विभागीय कृषि सह संचालक, छत्रपती संभाजीनगर,
चेतना मंगल कार्यालय (रामायणा कल्चरल हॉल), ओंकारेश्वर चौक, उल्कानगरी, छत्रपती संभाजीगर – ४३१००९
दुरध्वनी क्रमांक : ०२४०-२३३१०९४ ई मेल :

निदर्शनास आले. सदरील प्रस्तावातील २५% पेक्षा अधिक झालेल्या परिमाणास (Quantity) विभागस्तरावरुन संमती देण्यात येत आहे.

सदरच्या कामाचे **चौथे** देयक अदा करण्यापुर्वी जिल्हा अंमलबजावणी कक्ष, बीड यांनी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात यावी.

१) **प्रत्यक्ष कामावरील खर्च मंजुर आदेशातील मंजुर रक्कम किंवा L१ Bidder ने भरलेली निविदर रक्कम यातील जी रक्कम कमी असेल त्यापेक्षा जास्त रक्कम खर्च होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.**

२) **बांधकामास लागलेला वाढीव खर्च / रक्कम स्वत: समुदाय आधारित संस्था कंत्राटदारास अदा करणार असल्याचे व ती वाढीव रक्कम प्रकल्पामार्फत देय होणार नसल्याचे बंधपत्र संबंधित समुदाय आधारित संस्थेकडुन घ्यावे.**

३) **याशिवाय देयकातील वाढीव रक्कम ही प्रकल्पाकडुन देय होणार नसल्याचे तसेच सदर रक्कम समुदाय आधारित संस्थाकडुन स्वनिधीतुन घेण्याबाबतचे संमतीपत्र ही निविदाधारकाकडुन घेण्यात यावे.**

४) या अनुषंगाने सादर केलेल्या Less Excess स्टेटमेंट ची पाहणी केली असता अनुक्रमांक ५७,५८, ५९,६१,६५,६६,६७ व ७४ या घटकांची अधिक झालेल्या परिमाणाचा टक्केवारीत उल्लेख रखाना क्रमांक १५ मध्ये करण्यात आला नाही व शेऱ्याच्या रखाना मध्ये कारणे नमूद केलेले आहेत त्याचबरोबर MB प्रमाणे झालेल्या कामाचे परिमाण देखील घेण्यात आले आहेत.सदर Less Excess स्टेटमेंट मध्ये वरील त्रुटी DIU स्तरावरुन पूर्तता करून **चौथे** देयक अदा करावे.

संदर्भिय क्र ४ नुसार प्रो कॉन फार्मर प्रो.कं.लि., ता.माजलगाव जि.बीड या समुदाय आधारित संस्थेला विभागीय नोडल अधिकारी, नोडल अधिकारी जिल्हा अंमलबजावणी कक्ष,विभागीय तंत्र अधिकारी व विभागीय सहाय्यक अभियंता स्थापत्य, विभागीय अंमलबजावणी कक्ष, छत्रपती संभाजीनगर यांनी चौथ्या देयकाची तपासणी केली असता झालेल्या बांधकामाप्रमाणे मोजमाप पुस्तकामध्ये नोंदी तपासण्यात आल्या. चौथ्या देयक प्रचलित मार्गदर्शक सुचनेनुसार कपाती झाल्याची आपल्या स्तरावरुन खात्री करुन देयक अदायगी करण्याची परवानगी देण्यात यावी.

करीता अग्रेषित.

01/10/25

(माधुरी सोनवणे)
नोडल अधिकारी,
विभागीय अमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प,
छत्रपती संभाजीनगर